# वेध लातूर

लातूर - दि. २५.१२.२०१६

सस्नेह नमस्कार,

वेध संयोजन समिती, लातूर व इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजीकल हेल्थ, ठाणे यांच्या समन्वयाने दरवर्षी जानेवारी महिन्यांत 'वेध' परिषदेचे आयोजन केले जाते. कुमारवयीन विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाजभान असलेले नागरिक यांच्यासाठी जीवनमूल्यांसह करिअरची ओळख करुन देणारी वार्षिक वेध परिषद ही आता लातूरकरांसाठी 'जीवन की पाठशाला' बनली आहे.

'लोकल ते ग्लोबल', 'कर्तृत्वाचे मोजमाप', 'ध्यास उत्कर्षाचा', 'अपयशाचे फायदे' आणि 'देणे निसर्गाचे' या वैविध्यपूर्ण विचारसूत्रांवर आधारित परिषदांच्या आयोजनानंतर यावर्षीचा वेध 'ऑफ बीट' (...रंग माझा वेगळा) हे 'हटके' विचारसूत्र घेऊन आपल्या भेटीस येत आहे.

आजच्या स्पर्धात्मक वातावरणात 'मळलेली वाट' अर्थात 'चाकोरी' बाहेरचा विचार करुन उद्याची स्वप्नं पाहणे हे खूप जोखीमेचे समजले जाते. परंतू 'हटके' जगण्यातील थ्रील अनुभवत स्वतःला सिध्द करणे हा आजच्या तरुणाईचा स्थायीभाव बनतो आहे.

असा हटके स्थायीभाव (ॲटीट्युड) असलेली सहा भन्नाट व्यक्तिमत्वं आपली 'कहाणी' घेऊन या वेध परिषदेत आपल्या बरोबर सहभागी होणार आहेत.

आपल्यापैकी प्रत्येकाला 'ऑफ बीट' जगण्यातले थ्रील अनुभवावे अशी सुप्त इच्छा असते, ज्यासाठी एखाद्या 'स्टार्टअप' ची गरज असते. वेध २०१७ हा स्टार्टअप घेऊन आपल्यापर्यंत येत आहे.

आपण आपल्या मित्र-मैत्रिणीसह, पाल्य-पालकांसह या ज्ञानरंजनाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे हे नम्र आवाहन !

**आपले स्नेहांकीत,**
**संयोजक वेध लातूर**

(आसनसंख्या मर्यादित असल्यामुळे आजच आपल्या प्रवेशिका आरक्षित करा.)

## - विचार सूत्र -

## *ऑफ बीट (... रंग माझा वेगळा)*

**| दिनांक** : रविवार, २२ जानेवारी २०१७ **| वेळ** : सकाळी ९:३० ते ४:३० **| स्थळ** : दयानंद महाविद्यालय सभागृह, लातूर

**प्रवेशिका मूल्य : रु. १००/-**

**प्रवेशिकांसाठी संपर्क**

9422940013, 9423077609
9421453277, 9421583986

**: प्रवेशिकांची उपलब्धता :**

**अक्षर रचना,** डॉ. देशमुख हॉस्पिटल कम्पाऊंड, गोरक्षण समोर, मेन रोड, लातूर

**मनमंदीर,** हनुमान चौक, लातूर.

**बँक ऑफ महाराष्ट्र,** सोनवणे कॉम्प्लेक्स, कामदार पेट्रोल पंपाजवळ, लातूर.

**सुचना :** ❖ कार्यक्रम नियोजीत वेळी सुरु होईल. ❖ विद्यार्थ्यांनी मध्यंतरासाठी आपला डबा व पिण्याचे पाणी सोबत आणावे. या शिवाय सभागृह परिसरात माफक दरातील टिफीन उपलब्ध आहे. ❖ परिषद दोन सत्रात असल्यामुळे मध्यंतरानंतर सभागृहात प्रवेश करण्यासाठी प्रवेशिका जपून ठेवावी. ❖ कृपया १४ वर्षाखालील पाल्यांना सोबत आणू नये.

# वेध २०१७ लातूर मधील सहभागी मान्यवर

**कॅप्टन सिध्दार्थ चक्रवर्ती :**

मर्चंट नेव्ही मध्ये १० वर्षे नौकरी केल्यानंतर समुद्रातील जैव विविधतेने भारावलेल्या या ध्येयवेड्या तरुणाने गलेलठ्ठ पगाराच्या नौकरीवर पाणी सोडून अनमोल सागरी संपत्तीच्या संवर्धनासाठी, 'सी शेफर्ड कॉन्झर्व्हेशन सोसायटी' या नेदरलँड स्थित विख्यात एनजीओ मध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. 'अंटार्क्टीकासह ५ प्रत्यक्ष कृती मोहीमांचे नेतृत्व करणाऱ्या सिध्दार्थचा प्रवास अत्यंत रोमांचक आणि प्रेरणादायी आहे.

**मंदार तुळणकर :**

पर्यायी उर्जा स्त्रोतांचा शोध हा आज जागतिक प्राथमिकतेचा प्रश्न बनलेला आहे. त्यासाठीचे अनेक प्रयोग जगभर अव्याहतपणे चालू आहेत. या पार्श्वभूमीवर नागपूरच्या या तरुण इंजिनिअरने वीजेच्या निर्मितीसाठीचा अफलातून मार्ग शोधला आहे. 'प्रेशर जनरेटस् एनर्जी' या तत्वाला अनुसरून माणसांच्या चालण्या–फिरण्यातून वीजेची निर्मिती करणाऱ्या या संशोधकाकडून आपण ऐकणार आहोत या अफलातून शोधाची गाथा.

**डॉ. अभिषेक सेन :**

सर्वसामान्यांना परवडणारी आरोग्य सेवा तीही गुणवत्तेशी तडजोड न करता उपलब्ध झाली पाहिजे अशी सामाजिक दायीत्वाची भावना बाळगणारा अभिषेक सेन प्रथम एम.बी.बी.एस. आणि नंतर बायोमेडीकल इंजिनिअरींग या दोन्ही पदव्या असलेला 'जगावेगळा' तरुण संशोधक–उद्योजक आहे. थ्री ईडीएट मधल्या 'रँच्यो' सारखाच ऑफ बीट 'दृष्टीकोन' असलेल्या या इंजिनिअर–डॉक्टर चा प्रवास थक्क करणारा आहे.

**रमा चोभे :**

ही गोष्ट आहे एका अनोख्या गुरुकुलाची आणि अफलातून गुरुची. व्हायोलीन हे तुलनेने अवघड आणि गंभीर वळणाचं वाद्य इथे शिकवलं जाते आणि शिष्यांचं वय असते सरासरी ३ ते ५ वर्षे. स्वतः भारतीय शास्त्रीय संगीताच्या अभ्यासक आणि उत्कृष्ट व्हायोलीन वादक असलेल्या रमा चोथे या अनोख्या गुरुकुलाच्या संस्थापिका. 'सुझुकी व्हायोलीन' या जपानी वादन शैलीने प्रभावित झालेल्या रमाताईंच्या मनस्वी सांगीतिक प्रयोग 'संगीत आणि जीवन' या विषयी आपल्याला खूप समृध्द दृष्टीकोन देणारा आहे.

**मंदार भारदे :**

महाविद्यालयीन काळात फिचर फिल्म्स–डॉक्युमेंटरीज बनवण्याच्या ध्यासात वणवण भटकणारा एक तरुण एका टप्प्यावर हेलीकॉप्टर, विमानांच्या आवाजाने, उड्डाणाने वेडावून जातो. एकदा तरी हेलीकॉप्टरला जवळून पाहता यावे, त्याला स्पर्श करावा यासाठी धडपडणारा नाशिकचा हा मध्यमवर्गीय तरुण पुढे 'मॅब एव्हीएशन प्रा. लि.' कंपनी स्थापन करुन एव्हीएशन चार्टर सर्व्हिसेसद्वारे देश–विदेशात नावलौकीक मिळवतो. त्याचीही 'भारदस्त भरारी' आपल्या स्वप्नपूर्तीला बळ देणारी आहे.

**या सर्वांशी आपल्यावतीने गप्पा मारणार आहेत सुप्रसिध्द मनोविकास तज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी.**

**संयोजन समन्वय**

**इन्स्टीटयूट फॉर सायकॉलॉजीकल हेल्थ, ठाणे**

(सुदृढ मन सर्वांसाठी)

**वेध संयोजन समिती, लातूर**

धनंजय कुलकर्णी
विजय भंडारी
डॉ. वर्षा पाटील
विजय मांडवेकर
जयमाला शिंदे
उदय मोरे
डॉ. दिनेश पाटील
ॲड. सुनिल देसाई
प्रकाश जोशी
दिपक माने
प्रशांत धामणगांवकर
ध्रुवराज मुजुमदार
शिल्पा येवतीवाड
डॉ. अर्चना आपटे
श्रीकृष्ण मांडे
सुनिता कदम
उत्तम होळीकर
प्रदीप सोलंकी
वर्षा देशपांडे
गीतांजली लाटवडे
अश्विनी सावंत
प्रा. उर्मिला धाराशिवे
नृसिंह नाईक
डॉ. मिलिंद पोतदार
बाळकृष्ण धायगुडे
प्रदीप कुलकर्णी
अनिल कुलकर्णी
महेश घोडके
विठ्ठल शेळके
दिवाकर धोंड
मयूर प्रयाग